श्री क्षेत्र निरानृसिंहपूर ता. इंदापूर जिल्हा पुणे तिर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक बैठक २०१६/३/प्र.क्र.२०२/ पर्यटन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- १५ मार्च, २०१८.

<u>संदर्भ</u> : १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.टीडीएस-२०१७/१/प्र.क्र.५८५/पर्यटन, दि.३०/३/२०१५.
२) शासन निर्णय,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.बैठक-२०१६/३/प्र.क्र.२०२/पर्यटन, दि.२३/३/२०१६.
३) शासन निर्णय,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.बैठक-२०१६/३/प्र.क्र.२०२/पर्यटन, दि.१६/११/२०१६.
४) शासन निर्णय,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.बैठक-२०१६/३/प्र.क्र.२०२/पर्यटन, दि.२८/४/२०१७.
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दि.२९/१२/२०१७,
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.२.२०१८
७) जिल्हा नियोजन अधिकारी,पुणे यांचे पत्र क्र. जिनिसपु/नि८/तीक्षेवि/७२५/२०१८, दि.१७/२/२०१८.

<u>शासन निर्णय</u> :

वरील वाचा येथिल संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णय,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.बैठक-२०१६/३/प्र.क्र.२०२/पर्यटन, दि.१६/११/२०१६ अन्वये श्री क्षेत्र निरानृसिंहपूर ता. इंदापूर, जिल्हा पुणे तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे

२. या आराखड्यातील पहिल्या टप्प्यातील पर्यटन विभागाशी संबंधित खालील कामांसाठी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयाद्वारे रु.१०.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(रु.कोटीत)

अ.क्र.	**कामाचे नाव**	**अंदाजित रक्कम**	**वितरीत रक्कम**
१	सार्वजनिक सोयी सुविधा	११.२७	१०.००
२	भक्त व पर्यटक विकास बांधकाम	१७.९६	
३	माणकेश्वरवाडा संरक्षक भिंतीचे संवर्धन व बांधकाम	१.६८	
	एकूण	३०.९१	१०.००

३. जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविल्यानुसार सदर आराखड्यातील कामांसाठी सन २०१७-२०१८ मध्ये रु.२१.८४ कोटीची आवश्यकता असल्याने सदर निधी उपलब्ध करुन देण्याच प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर निधी उपलब्ध करुन देण्यासाठी विधानमंडळाच्या डिसेंबर २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात रु.२१.८४ कोटी निधीची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती तीमान्य झाली आहे. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.२.२०१८ मधील तरतुदीनुसार रु.२१.८४ कोटीपैकी ८०% म्हणजे

रू.१७.४७ कोटी एवढी रक्कम पुढील तक्त्यात नमूद केलेल्या कामांसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांना वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

निरा-नृसिंहपूर, ता.इंदापूर, पुणे तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे व मंजूर निधी

(रुपये कोटीत)

अ.क्र.	विभाग	बाब	सन २०१७-१८ करिता मागणी	२०१७-१८ करिता वितरीत निधी.
१	२	३	४	५
१	पर्यटन विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग	भक्त व पर्यटक निवास बांधकाम करणे	१५.५५	१७.४७
		माणकेश्वर वाडा संरक्षक भिंतीचे संवर्धन व बांधकाम		
		सार्वजनिक सोयी-सुविधा टप्पा-१		
२	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण	निरा-नृसिंहपूर पाणीपुरवठा योजना	३.००	
३	जलसंपदा विभाग	बुडित बंधारा बांधणे व जुन्या जुन्या घाटासाठी संरक्षक भिंत बांधणे	३.२९	
		एकूण	**२१.८४**	**१७.४७**

४. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग शासन परिपत्रक दि.१७/४/२०१५ च्या परिच्छेद ७ ते १८ मधील प्रत्येक अटीची खालील प्रमाणे पुर्तता करण्यात आली आहे.

अ.क्र.	**परिपत्रकातील परिच्छेत क्र.**	**विषय**	**विभागाचे अभिप्राय**
१	७-अ	एखाद्या योजनेस / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे	प्रशासकीय विभाग असलेल्या अधिकाराअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. यास उच्चाधिकार समितीची मान्यता घेतली आहे.
२	७-ब	अर्थसंकल्पिय तरतूद करणे आवश्यक असते (योजनांतर्गत नियतव्यय उपलब्ध) व अर्थसंकल्पित करणे	अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध आहे.
३	८	प्रशासकीय विभागांना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/ विनियम, दि.१५ मे, २००९ अन्वये अधिकार असणे	वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग - पहिला,उप विभाग एक अ.क्र. २७ नियम क्र. १४९ नुसार प्रशासकीय विभागांला पुर्ण अधिकार आहे.
४	९	विविध शासकीय / प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने	ही नविन मंजूरी आहे.

		मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी खर्च केलेल्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणे	
५	१०	विभागाद्वारे संक्षिप्त देयकाद्वारे निधी खर्च करण्यात येतो. त्याचे तपशीलवर देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात.	संक्षिप्त देयकाद्वारे निधी काढण्यात येत नाही.
६	११	स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने	लागू नाही.
७	१२	वैयक्तिक लाभर्थीच्या योजनेची देयके	लागू नाही.
८	१३	शिष्यवृत्ती / शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्तिकाभार्थी यांच प्रदाने	लागू नाही.
९	१४	बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्र.मा./तां.मा. तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता	होय. दि.१४/१२/२०१५ च्या बैठकीत सचिव समितीची मान्यता घेतली आहे.
१०	१५	दुय्यम कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रितसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढण्यात यावेत	खरेदी नसल्याने लागू नाही.
११	१६	साहित्य खरेदीची प्रक्रिया पुर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्याशिवाय खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात येऊ नये.	लागू नाही.
१२	१७	विविध करणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांची त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकदृष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते.	लागू नाही.
१३	१८	विभागांमार्फत करण्यात येणारे संगणकीकरण संदर्भातील खर्च शासनाचे दरपत्रकानुसार/निविदाद्वारे करण्यात यावा.	लागू नाही.

५. तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३,दि.१७/४/२०१५ च्या परिशिष्टामधील तपासणी सूचीतील अ.क्र. १,२ व ३ ची पुर्तता करण्यात आली आहे. अनुक्रमांक ४ बाबत स्पष्ट करण्यात येते की, लेखापरीक्षक/महालेखापाल यांचे कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.

६. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्रशा-५, दि.२४/७/२०१५ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार खालील प्रमाणे प्रमाणित करण्यात येत आहे.

तपासणी सूची	पर्यटन विभागाचे अभिप्राय
योजनेस प्रशासकीय मान्यता	प्रस्तावित निधीच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता झाल्यानंतरच होणार आहे.	होय.
३ महिन्यापूर्वी वितरीत केलेल्या निधीपैकी ७५% खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र	ही नविन मंजूरी आहे.
यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.	नाही.
निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे.	लागू नाही.
वस्तु खरेदी करण्यापूर्वी नियमित वापरात येणा-या वस्तुंच्या बाबतीत त्याचे रितसर खरेदी नियोजन (Procurement plan) करावे व अकारण शिल्लक साठा (inventary) असून नये.	लागू नाही. ही वस्तु खरेदी नाही.
भांडवली वस्तु खरेदी करण्यापूर्वी यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची यथास्थित नोंद जडवस्तू संग्रह नोंदवहीमध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र.	भांडवली वस्तु खरेदीचे प्रकरण नाही. लागू नाही.
यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे.	ही वस्तु खरेदी नाही.
आवश्यक त्या ठिकाणी आदिवासी / सामाजिक न्याय विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे.	आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाचा संबंध नाही.
प्रस्तुत योजनेत कोणतेही १ वर्ष जुने संक्षिप्त देयक त्याच लेखाशीर्षाखाली प्रलंबित नाही.	कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही
निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.-	नाही. तथापि संबंधित कार्यान्वयिन यंत्रणेस निधी वितरीत करण्यात येतो.

७. **अटी व शर्ती :-**

१) वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

२) कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, पुणे यांची राहील व जादा खर्च प्रित्यर्थ जादा अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. तसेच कार्यान्वयीन यंत्रणा पूर्वीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणेच राहील.

३) मंजूर तरतुदीतून करावयाचा खर्च दि.३१ मार्च, २०१८ पर्यंत करण्यात यावा व मंजूर कामे तात्काळ पूर्ण करावीत.

४) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तीय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्राधिका-यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

५) अशा प्रत्येक योजनेबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमांप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र ५, दि. ६ फेब्रुवारी, २००२ च्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.बीजीटी-१०.००/प्र.क्र.५६/२०००/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंत करण्यात यावी.

६) तांत्रिक मान्यता विहित स्तरावर घेण्यात यावी.

७) रस्त्यांच्या प्रस्तावित कामांच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

८) योजनेतर स्वरुपाच्या कामासाठी (देखभाल/दुरुस्ती इ.) सदरची तरतूद उपयोगात आणली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

९) सदर कामांपैकी जी कामे तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रस्तावित करुन देवस्थान/संस्थेच्या जागेवर करण्यात येणार आहेत अशा कामांसंदर्भात सदर देवस्थान/संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामाच्या पूर्णत्वानंतर त्या संदर्भातील देखभाल/दुरुस्ती, संबंधित संस्थेने करण्यासंदर्भात जिल्हाधिका-यांनी संबंधित देवस्थान / संस्थेबरोबर करारनामा करणे बंधनकारक राहील. अशा प्रकारच्या देखभाल दुरुस्तीकरिता शासनाकडून यापुढे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी व तशी अट करारात अंतर्भूत करण्यात यावी. तसेच या कामामुळे निर्माण होणाऱ्या सर्व सुविधा तसेच पर्यटनस्थळ सर्व नागरिकांसाठी खुले राहील, अशी अट करारात समाविष्ट करण्यात यावी.

१०) सदर निधीतून होणाऱ्या खर्चातून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती तसेच निधीतून होणा-या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यात शासनास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता शासनास सादर करण्यात यावे.

११) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम व संबंधीत संस्था यांची राहील.

१२) वर नमूद करण्यात आलेला खर्च हा सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून मुख्यलेखा शीर्ष "मागणी क्रमांक झेडडी-४, ३४५२-पर्यटन, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१ पर्यटन केंद्रे (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (१८) पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणांसाठी मूलभूत सुविधांकरिता अनुदान (३४५२ १९५ ८) ३१ सहाय्यक अनुदाने" या लेखा शिर्षाखाली मंजुर तरतूदीमधून भागविण्यात यावा. या प्रकरणी मंजूर करण्यात आलेल्या (प्रादेशिक

पर्यटन योजनेअंतर्गत) सहाय्यक अनुदानाची रक्कम आहरण करुन संबंधितांना वितरीत करण्याकरिता सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे / जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व जिल्हाधिकारी, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात देयके सादर करुन संबंधितांना रक्कम वितरीत करण्यात यावी.

१३) हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८६/२०१८/व्यय-१५, दि.८/३/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१३२८२३३४२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae5e5678dc8c9d9c01f7043448a53f6a9fbe81e46d183af43c9a9e01eb42c7c7, serialNumber=93c11f919f0c5fba6953b4841cc8cfd46b2b788da139e3f21b3d79d2cf976efa, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2018.03.16 13:30:15 +05'30'

(र. ल. लखोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. मंत्री, पर्यटन यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, पर्यटन यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा
७. सर्व मा. विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद
८. सर्व मा. विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधान सभा
९. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
११. महालेखापाल (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१३. जिल्हाधिकारी, पुणे.
१४. जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१८. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
१९. वित्त विभाग (का.व्यय-१५) मंत्रालय, मुंबई,
२०. अवर सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, (अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती, पर्यटन.